दैनिक

अन्यायाचा प्रतिकार

# रायगड नगरी

महाराष्ट्राचा बुलंद आवाज..

• वर्ष १६ वे • अंक ३२६ • MAHMAR/2006/17212 • रायगड • रविवार दि.२० फेब्रुवारी २०२२ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com



महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती पनवेलमध्ये मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. पनवेल शहरात असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्यास तसेच विविध ठिकाणी आयोजित करण्यात आलेल्या उत्सवात छत्रपती शिवाजी महाराजांना भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी अभिवादन केले.

## पनवेल महापालिकेच्या वतीने शिवजयंती साजरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त पनवेल शहरातील महाराजांच्या पुर्णाकृती पुतळा व अर्धाकृती पुतळ्याला, महापौर डॉ कविता किशोर चौतमोल, आमदार प्रशांत ठाकूर ,आयुक्त गणेश देशमुख यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.



छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्ताने सुमेध भालेराव या शालेय विद्यार्थ्याचे भाषण झाले. शहरातील तरुण मंडळांनी विविध ठिकांणांहून शिवज्योत आणून महाराजांना अभिवादन केले. महापालिकेच्यावतीने महाराजांच्या पुर्णाकृती पुतळा व अर्धाकृती पुतळा परिसराला फुलांची सजावट करण्यात आली होती. यावेळी नगरसेवक तसेच अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, उपायुक्त विठ्ठल डाके, उपायुक्त गणेश शेटे, उपायुक्त कैलास गावडे, सहाय्यक आयुक्त वंदना गुळवे, सहाय्यक आयुक्त सुवर्णा दखणे, तहसीलदार विजय तळेकर, महापालिकेतील विभाग प्रमुख, अधिकारी वर्ग, कर्मचारी उपस्थित होते. तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

### मुंबई पुणे एक्सप्रेस वे वर भीषण अपघात

## भरधाव ट्रेलरची ४ गाड्यांना धडक ; २ जणांचा जागीच मृत्यू

**दै.रायगड नगरी । खोपोली**

मुंबई पुणे एक्स्प्रेस वे वर आज भीषण अपघात झाला. ट्रेलरने एकापाठोपाठ चार कारला धडक दिली. या अपघातात दोन जणांचा जागीच मृत्य झाला, तर दोघे जखमी झाले आहेत. जखमींना कामोठे येथील एमजीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

मुंबई पुणे एक्स्प्रेस वे वर शनिवारी दुपारी मुंबईकडे जाणाऱ्या एका भरधाव ट्रेलरने तब्बल ४ गाड्यांना धडक दिल्याने भीषण अपघाताची घटना घडली. चालकाचे ट्रेलरवरील नियंत्रण सुटल्यानं हा अपघात घडल्याची माहिती समोर आली आहे. मुंबईकडे निघालेल्या ट्रेलर बोरघाटातून जात असताना अचानक चालकाचे ट्रेलवरील नियंत्रण सुटले. त्यानंतर ट्रेलरने पहिली धडक एका ह्युंदाई कारला दिली. ट्रेलरचा वेग जास्त असल्याने नंतर काही अंतरावर असलेल्या क्रेटा कारवर जाऊन धडकला. त्यामुळे क्रेटा कार मीडिल गार्डन मध्ये घुसली.

नियंत्रण सुटलेल्या ट्रेलरने नंतर पुढे जाऊन काही किलोमीटर अतंरावर असलेल्या इर्टीगा गाडीला उडवले. त्यानंतर सुसाट निघालेला ट्रेलर बलेनो कारला जाऊन धडकला. अचानक धडक बसल्याने कार उलटली. लागोपाठ सहा गाड्यांना धडक दिल्यानंतर १०० अंतर पुढे जाऊन ट्रेलर महामार्गाच्या डाव्या बाजूस उलटला.

ट्रेलरने एकूण चार वाहनानांना धडक दिली. सुदैवाने त्या चारी गाड्यांतील प्रवाशी थोडक्यात बचावले. मात्र त्यांना किरकोळ मार लागला आहे. जखमींपैकी दोघांना कामोठे येथील एमजीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, ट्रेलरमधील दोन जणांचा मृत्यू झाला आहे. दोन्ही मृतांची नावं समजु शकली नाहीत. अपघाताची माहिती मिळताच घटनास्थळी आयआरबी पेट्रोलिंग, देवदूत यंत्रणा, महामार्ग वाहतूक पोलीस, खोपोली पोलीस स्टेशनची यंत्रणा, डेल्टा फोर्स, लोकमान्य आरोग्य सेवा यांनी धाव घेत मदत कार्य हाती घेतले. या अपघातात अनिता सिंग (वय ५४, गंभीर) अखिलेश सिंग (वय ५५ किरकोळ जखमी) रा. रोसे–पारडे, पुणे हे दोघे जखमी झाले. दोघांनाही तातडीने कामोठे येथील एमजीएम रुग्णालयात हलवण्यात आले.



## शिवप्रेमींची मोटारसायकल २०० फुट दरीत कोसळली

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

स्वराज्याची राजधानी असलेल्या किल्ले रायगडावर छ. शिवाजी महाराजांना अभिवादन करण्यासाठी शिवप्रेमी व नागरिक मोठ्या संख्येने येत जात असतात. शिवजयंतीनिमित्त शनिवारी दि.(१९) छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्ताने भोर येथून शिवज्योत आणण्यासाठी रायगडच्या दिशेने निघालेल्या तीन शिवप्रेमींची मोटारसायकल २०० फुट

दरीत कोसळली. ही घटना सकाळी साडेतीनच्या सुमारा घडली असून वरंध घाटात



अपघात कावळे किल्ल्याजवळ अपघात झाला असल्याची प्राथमिक माहिती मिळली आहे. अपघातामध्ये तीघेजण एकाच मोटारसायकलवर होते. गाडीवर संयम सुटल्याने हा प्रकार घडला आहे. तिघांनाही महाडच्या

.../२




### दै.रायगड नगरीच्या वृत्ताची दखल...

## बेकायदेशीरपणे कचरा- डेब्रिज टाकण्यात येणाऱ्या वाहनांवर जप्तीच्या कारवाईचे आदेश

### उपजिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानंतर डेब्रिज माफियांचे धाबे दणाणले

**दै.रायगड नगरी । उरण**

दै.रायगड नगरीने शुक्रवार दि.१८ फेब्रुवारी रोजी याबाबतीत वृत्त प्रसिद्ध केले होते. त्या वृत्ताची दखल घेवून मुंबईतील जासई – गव्हाण – वहाळ ग्रामपंचायतींच्या हद्दीत बेकायदेशीरपणे हजारो टन कचरा– डेब्रिज टाकण्यात येत असलेल्या अवजड वाहनांवर जप्तीची कारवाई करण्याचे आदेश उपजिल्हाधिकारी राहुल मुंडके यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले आहेत. यामुळे डेब्रिज माफियांचे धाबे चांगलेच दणाणले आहेत.




मुंबईतून दररोज हजारो टन कचरा –डेब्रिज जासई–गव्हाण–वहाळ ग्रामपंचायतींच्या हद्दीत बेकायदेशीरपणे टाकण्यात येत आहे.या डेब्रिजमध्ये गटारातील घाण, मृत पशुपक्षी, प्राण्यांच्या अवयवांमुळे हवेतही मोठ्या प्रमाणात दुर्गंधी पसरत असल्याने वायु प्रदुषणात भर पडली आहे.परिसरात वाढते वायु प्रदुषण व दुर्गंधीमुळे नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. मुंबईतील दररोज येणारा हजारो टन कचरा डेब्रिज उलवे नोड परिसरात आणखी बऱ्याच ठिकाणी हा धोकादायक डेब्रिज कचरा टाकण्यात येत आहे.यामुळे खाड्याही बुजविण्यात आल्या आहेत.बामणडोंगरी खाडीत तर चक्क खारफुटींवर हा कचरा टाकून कांदळवन नष्ट करण्यात येत आहेत.तर काही ठिकाणी डेब्रिज कचरा धुतला जातो आहे. डेब्रिज कचरा धुतलेले दूषित घाण पाणी थेट समुद्र, खाड्यात सोडले जात आहे.

या दुषीत पाण्यामुळे समुद्र, खाड्याही प्रदुषित झाल्याने येथील स्थानिक मच्छीमारांना मासळी मिळेनाशी झाल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली असल्याची माहिती शेकाप नेते राजेंद्र पाटील यांनी दिली आहे. या गंभीर प्रश्नांबाबत येथील ग्रामपंचायतीनी सिडको, पोलिस आणि संबंधित विभागाकडे तक्रारी केल्या आहेत. मात्र त्याकडे लक्ष देण्याची सुबुद्धी कोणत्याही विभागाच्या अधिकाऱ्यांना अद्यापही सुचलेली नाही.

या गंभीर समस्येला दैनिक रायगड नगरी ने वाचा फोडली होती. त्यानंतर सदर वृत्ताची दखल घेऊन मुंबईतील जासई–गव्हाण–वहाळ ग्रामपंचायतींच्या हद्दीत बेकायदेशीरपणे कचरा– डेब्रिज टाकण्यात येत असलेल्या अवजड वाहनांवर जप्तीची कारवाई करण्याचे आदेश उपजिल्हाधिकारी राहुल मुंडके यांनी पोलिसांसह संबंधित सर्व विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले आहेत. यामुळे डेब्रिज माफियांचे धाबे दणाणले आहेत.

## शिवजयंतीच्या निमित्ताने रूग्णवाहिका लोकार्पण सोहळा

### जे.एम.म्हात्रे चॅरीटेबल संस्थेचा स्तुत्य उपक्रम




**दै.रायगड नगरी । पनवेल**

शिवजयंतीचे औचित्य साधून जे. एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्थेच्या पुढाकाराने खांदा कॉलनी, पनवेल आणि नवीन पनवेल मधील रुग्णांसाठी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे यांच्या संकल्पनेतून ना नफा, ना तोटा या तत्वावर रुग्णवाहिका लोकार्पण सेवेचा शुभारंभ करण्यात आला.

याविषयी अधिक माहिती देताना श्री प्रीतम म्हात्रे म्हणाले की कोरोना काळात मी माझ्या जे एम म्हात्रे चॅरिटेबल संस्थेच्या माध्यमातून पनवेल करांसाठी आरोग्य सेवेमध्ये वेगवेगळ्या ठिकाणी औषध उपलब्ध करून देणे आवश्यक त्या रुग्णांसाठी मोफत रुग्णवाहिका सेवा देणे योग्य उपचारासाठी हॉस्पिटलमध्ये जागा करून देणे या अशा अनेक गोष्टी वेळप्रसंगी गरीब व गरजू रुग्णांना हॉस्पिटलची संपूर्ण जबाबदारी उचलणे अशा प्रकारच्या अनेक सेवा केल्या. त्यादरम्यान माझ्या असे लक्षात आले की काही ठिकाणी रुग्णवाहिका चालक जास्त दरात रुग्णवाहिका देऊन या रुग्णवाहिका सेवेचा दुरुपयोग करून नागरिकांना ठिकाणी वेठीस धरण्याचे प्रकार घडत आहेत. यावर उपाय म्हणून मी या अगोदरही दोन रुग्णवाहिका ना नफा ना तोटा या तत्वावर पनवेल–उरण ला सेवा सुरू केली आज छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीचे औचित्य साधून मी खांदा कॉलनी मध्ये या रुग्णवाहिका सेवेचा लोकार्पण केले. यापुढेही पनवेल महानगरपालिका क्षेत्रात आवश्यक त्या ठिकाणी अशा प्रकारची सेवा देण्याचा माझा मानस आहे.

या कार्यक्रमाच्या वेळी शेतकरी कामगार पक्षाचे जिल्हा चिटणीस गणेश कडू, नगरसेविका डॉ.सौ.सुरेखा मोहकर, सौ.प्रीती जॉर्ज म्हात्रे,सौ.सारीका भगत, सौ.कुसुम गणेश पाटील, मा.उपनगराध्यक्ष गणेश पाटील, शेकाप खांदा कॉलनी अध्यक्ष

.../२


## उलवे नोडमध्ये उभा राहणार शिव छत्रपतींचा भव्य दिव्य अश्वारूढ पुतळा

### शिवजयंतीच्या मुहूर्तावर प्रतिमेचे पूजन



**दै.रायगड नगरी । पनवेल**

उलवा नोडमधील खारकोपर रेल्वे स्टेशन जवळ महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य दिव्य अश्वारूढ पुतळा उभारण्यात येणार असून शिवजयंतीच्या मुहूर्तावर त्या जागेवर शिवजयंती साजरी करत महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिवादन करण्यात आले.



जेथे शिवसृष्टी व शिवरायांचा अश्वारूढ पुतळा उभारण्यात येणार आहे त्याप्रत्यक्ष जागेवर आज जाऊन प्रतिमेचे पूजन माजी खासदार तथा समितीचे अध्यक्ष लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, सरचिटणीस, कामगार नेते महेंद्र घरत, उद्योजक जे. एम. म्हात्रे, भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. यावेळी पंचायत समिती सदस्य रत्नप्रभा घरत, भाऊशेठ पाटील, वसंत पाटील, प्रकाश भगत, विश्वनाथ कोळी, वसंत म्हात्रे, गव्हाण सरपंच माई भोईर, उपसरपंच विजय घरत, न्हावा सरपंच हरेश म्हात्रे, जितेंद्र म्हात्रे,

.../२

# राजकीय पक्षांनी माथेरानची रुग्णवाहिका बनवलीय वडाप

**दै.रायगड नगरी । माथेरान**

रुग्णांना अत्यावश्यक सेवा उपलब्ध असावी याकामी पंधरा वर्षांपूर्वी लोकांच्या आग्रहास्तव माथेरान या नगरीत मोटार वाहनांना बंदी असताना सुध्दा केवळ रुग्णांना वेळेत उपचार मिळावेत यासाठी सुरू करण्यात आली होती परंतु रुग्णांना सेवा देण्याऐवजी येथील काही पक्षाच्या मंडळींनी या गाडीचा एखाद्या वडाप प्रमाणे राजरोसपणे वापर सुरू केला आहे. दिवसभर या गाडीच्या फेऱ्या सुरू असतात याचा हिशोब सुध्दा दिला जात नाही. आणि ठराविक लोकप्रतिनिधींनी अनाठायी वापर सुरू केल्याचे दिसून येत आहे. खासदार बारणे यांच्या खासदार निधीतून तीन वर्षापूर्वी दिलेली रुग्णवाहिका काही चालकांच्या मनमानी मुळे डबघाईला आलेली आहे. दस्तुरी ते माथेरान दरम्यान ३०० रुपये आकारले जातात.दिवसभरात सध्यातरी वीस पेक्षाही अधिक फेऱ्या ही गाडी मारत असते परंतु आजतागायत ह्या गाडीची सेवा तोट्यात दाखवली जात आहे. या गाडीशी संबंधीत मंडळी आर्थिक लाभ घेत आहेत आणि सर्रासपणे वापर सुध्दा करीत आहेत. मागील काळात वेळेवर रुग्णवाहिका न मिळाल्यामुळे अनेकांना आपले प्राण गमवावे लागले होते.



रुग्णवाहीका या नावातच ती रुग्णांसाठी आहे हे सर्वांना माहीत असुन देखील धडधाकट माणस तीचा वापर करतात. हे अस का होत? ते रुग्ण कसे? हा प्रश्न अनेकांना पडतो. परंतु आपल्याकडे रुग्णांच्या एका वर्गाकडे दुर्लक्ष करतो. रुग्णांचा तो वर्ग म्हणजे 'मनोरुग्ण'! हे जे रुग्णवाहीकेचा वापर सत्तेच्या माजातुन करतात, ते मनोरुग्णच असणार. त्याशिवाय का कोणी रुग्णवाहीका वापरण्यात धन्यता आणि भुषण मानतील.

इमर्जन्सीला रुग्णवाहीका नादुरुस्त असल्यामुळे, ती उपलब्ध न झाल्यामुळे अनेक जणांना प्राण गमवावे लागलेत हे माहीत असुन देखील दांडगाईच्या जोरावर, आम्ही या गावात काहीही करु शकतो ही मिजास सर्वसामान्यांच्या जीवाशी खेळच आहे. दुर्दैव हे की ज्या जनतेसाठी ही सेवा आहे त्यांना जोपर्यंत स्वत:वर वेळ येत नाही तोपर्यंत काही सोयरसुतक नाही.

# श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल जासई येथे शिवजयंती उत्साहात साजरी

**दै.रायगड नगरी । उरण**

रयत शिक्षण संस्थेचे श्री.छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि.बा.पाटील ज्युनिअर कॉलेज जासई विद्यालयात महाराष्ट्राचे आराध्यदैवत, युगपुरुष, क्षत्रिय कुलवंत श्री.छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात संपन्न झाली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे पुजन शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, कामगार नेते, भारतीय मजदूर संघाचे राष्ट्रीय सरचिटणीस सुरेश पाटील व विद्यालयाचे चेअरमन अरुण जगे यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी प्रांगणात असलेल्या विविध महापुरुषांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आले, शिवजयंती निमित्त विद्यालयात पथनाट्य, पोवाडे, विविध वेषभूषा अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात आला. या कार्यक्रमास व्हाईस चेअरमन रामभाऊ घरत, नरेश घरत, मधुकर पाटील, अमृत ठाकूर, यशवंत घरत, पद्माकर घरत, रमेश पाटील, विवेक म्हात्रे, सुभाष घरत, सुनील घरत, गोविंद घरत, विद्यालयाचे प्राचार्य व रयत शिक्षण संस्थेचे लाईफ वर्कर अरुण घाग, उपमुख्याद्यापक मोरे सर, पर्यवेक्षक साळुंखे, सर्व सेवक वृंद व विद्यार्थी उपस्थित होते.

विद्यालयाचे प्राचार्य अरुण घाग यांनी शिवाजी महाराजांच्या कार्याची महती सांगितली, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रयत सेवक संघाचे महाराष्ट्राचे समन्वयक नुरा शेख यांनी केले, विद्यार्थी पथनाट्य वेषभूषा यांचे नियोजन सौ.घरत पी.जे यांनी केले तर आभार उपमुख्याध्यापक मोरे यांनी मानले.

# कर्जतमध्ये कर्मवीर भाऊसाहेब राऊत यांची ११८ वी जयंती उत्साहात साजरी

**दै.रायगड नगरी । कर्जत**

स्वातंत्र्य सेनानी कुलाबा जिल्ह्याचे माजी खासदार स्वातंत्र्यत्रपूर्वी काळातील कर्जत चे आमदार कर्मवीर भाऊसाहेब राऊत यांची ११८ वी जयंती आज दि.१९ फेब्रुवारी रोजी स्वातंत्र्य सेनानी भाऊसाहेब राऊत चौक कर्जत येथे स्वराज्य सामाजिक संस्था कर्जत यांच्या वतीने साजरी करण्यात आली.

कर्मवीर भाऊसाहेब राऊत यांचा पणतू रोहन राऊत यांच्या हस्ते चौकाचे पूजन केले. डॉ रमेश पोवार यांनी शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे माजी विस्तार अधिकारी जी. एस. म्हात्रे यांनी भाऊसाहेब राऊत तर स्वराज्य सामाजिक संस्थेचे अध्यक्ष भगवान धुळे यांच्या हस्ते हुतात्मा भाई कोतवाल व हुतात्मा हिराजी पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन केले. गुजरात मधील एका कंपनीचे व्यवस्थापक महेश कोळंबे यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून कार्यक्रमाचा शुभारंभ केला.



इतिहास संशोधक वसंत कोळंबे यांनी कर्मवीर भाऊसाहेब राऊत यांच्या बद्दल माहिती दिली. रोहन राऊत यांनी आपले मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन प्रा. विजय कोंडीलकर यांनी तर आभार प्रदर्शन संतोष कोळंबे यांनी केले. या कार्यक्रमाला स्वराज्य सामाजिक संस्थेचे उपाध्यक्ष सविता कोळंबे, सचिव रोहिदास लोभी, जगदीश जाधव, टी. आर. पाटील, दत्ता कोळंबे डॉ. पवार, सिद्धार्थ ढोले, विशाल माळी, रघुनाथ विभार, रेश्मा ठोंबरे, साईनाथ श्रीखंडे आदी उपस्थित होते.

# छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर आणि अधिकाऱ्यांनी रायगडावर केले अभिवादन

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

आज शिवजयंती... राजांचा राजा शिवछत्रपती यांचा जन्मदिवस.. या पवित्र दिवशी रायगड किल्ल्यावर जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मृतीला अभिवादन करून किल्ल्यावरील राजसदर, महाराजांची समाधी, जिजामाता समाधी येथेही आदरांजली वाहिली.

यावेळी अप्पर जिल्हाधिकारी अमोल यादव, उपविभागीय अधिकारी महाड श्रीमती प्रतिमा पुदलवाड, कार्यकारी अभियंता रायगड विकास प्राधिकरण श्री. बामणे, श्री.भामरे, अलिबाग उपविभागीय अधिकारी प्रशांत ढगे, तहसिलदार सचिन शेजाळ, तहसिलदार सुरेश काशीद, पो-लीस निरीक्षक श्री. देशमुख तसेच महाड प्रांत व तहसील कार्यालयाचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.



या भेटीदरम्यान जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव रायगड विकास प्राधिकरण डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी रायगड विकास प्राधिकरणामार्फत रायगडावर सुरू असणाऱ्या जतन, संवर्धन व विकास कामांची पाहणी केली. या टप्प्यात सुरू असलेली कामे प्रामुख्याने फुटका तलाव, जलस्त्रोतांचे पुनरूज्जीवन, जगदीश्वर मंदिर, फरसबंदी मार्गिका, महादरवाजा तटबंदी संवर्धन, नाने दरवाजा संवर्धन व पुनर्बांधणी तसेच राजमाता जिजाऊ समाधी येथील विकासकामे या कामांची पाहणी करून सविस्तर आढावा घेतला तसेच झालेल्या कामांबाबत समाधानही व्यक्त केले.

त्याचप्रमाणे कामांच्या प्रगतीत सातत्य ठेवण्याबाबत सूचना प्राधिकरण व विशेष स्थापत्य पथकाच्या अधिकारी वर्गास दिल्या. यावेळी किल्ल्यावर स्वच्छता मोहीमही राबविण्यात आली. या स्वच्छता मोहिमेत उपस्थित अधिकारी कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

जिल्हाधिकारी डॉ. कल्याणकर यांनी सावित्री नदीमधील गाळ काढण्याचे काम सुरू असलेल्या ठिकाणी भेट दिली. यावेळी कार्यकारी अभियंता श्री.धाकतोडे उपस्थित होते. जिल्हाधिकाऱ्यांनी गाळ काढण्याच्या कामासंदर्भातील आढावा घेतला व गाळ काढण्याचा वेग वाढविण्याबाबत तसेच अन्य सूचना दिल्या.

विंचू दंशावरील औषधोपचाराचा शोध लावून अनेकांचा जीव वाचविण्याचे महान कार्य करणाऱ्या डॉ. हिम्मतराव बावस्कर यांना नुकताच पद्मश्री पुरस्कार जाहीर झाला आहे. आजच्या शिवजयंतीचे औचित्य साधून जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांनी पद्मश्री डॉ.हिम्मतराव बावस्कर यांच्या घरी सदिच्छा भेट देऊन त्यांचे विशेष अभिनंदन केले. यावेळी डॉ. बावस्कर यांनी बॅरिस्टरचे कार्ट हे त्यांचे आत्मकथनपर पुस्तक जिल्हाधिकाऱ्यांना भेट दिले.

# म्हसळ्यात श्री धावीरदेव महाराज मंदिरात चोरी

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

म्हसळा शहरातील ग्रामस्थ, भाविक भक्तांचा श्रद्धास्थान असणारे ग्रामदैवत श्री धावीरदेव महाराज मंदिरात अज्ञात चोरट्याने प्रवेश करून दानपेटीवर डल्ला मारल्याची घटना घडली आहे. घटनेची म्हसळा पोलीस ठाण्यात पुजारी गणेश सुभाष म्हशीलकर रा.कुंभारवाडा यांनी फिर्याद दिले वरून पोलिसांनी अज्ञात इसमाचे विरोधात गुन्हा रजिस्टर नंबर ९/२०२२,आयपीसी कलम ४५४, ४५७, ३८० अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

चोर अनेक प्रकारच्या चोरी करतो ते देव पहात असतो पण देवाचेच मंदिरात प्रवेश करून दानपेटी चोरून देवालाही न सोडणाऱ्या चोराने अजब करामत केली आहे. घटनेची पोलिसांनी अधिक माहिती दिली असता दिनांक १८ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ७.३० ते दिनांक १९ फेब्रुवारी (छत्रपती शिवाजी महाराज जयंती दिनी) सकाळी ८ वाजताचे दरम्यान कोणीतरी अज्ञात इसमाने धावीरदेव मंदिराचे उजव्या बाजूच्या दारवाजाचे कडी कोयंडा तोडुन आत प्रवेश केला असल्याचा प्राथमिक अंदाज वर्तवला जात आहे.सुरवातीला चोरांनी मंदिराचा मुख्य दरवाजाचा कडी कोयंडा तोडून मंदिरात प्रवेश करण्याचा प्रयत्न केला होता परंतु तो साध्य झाला नसल्याचे समजते. चोरांनी मंदिरातील गाभाऱ्यातील दान पेटी घेऊन मंदिराचे बाजुलाच असलेल्या श्रीराम व्यायाम शाळेत नेऊन त्यातील २९०० रूपांची रोकड लंपास केली असल्याचे फिर्यादीने नमूद केले आले आहे. चोराने चोरी करताना चाणक्य नीती वापरून दानपेटी तेथेच सोडुन देत पेटीत काही नोटा व चिल्लर शिल्लक ठेवून पोबारा केला असल्याचे समजते.

चोरीचा लागलीच तपास उलगडा करण्यासाठी म्हसळा पोलिसांनी अलिबाग येथुन स्वानपथक बोलावून आणि फिंगरप्रिंट काढून तपास सुरू केला आहे.चोरीच्या घटनेचा अधिक तपास म्हसळा पोलीस निरीक्षक उद्धव सुर्वे यांचे मार्गदर्शनाने पोलिस हवालदार के.ए.नलावडे(११७९) हे करीत आहेत. शहरात अधूनमधून भुरट्या चोरीच्या घटना घडत असतात दोन महिन्यापुर्वी मंदिर परिसरात एकाच रात्री सहा घरफोडी झाल्या होत्या. मात्र चोरीचा अद्याप तपास सुरू असताना चोरांनी लोकवस्तीतील मंदिरात चोरी करून पोलिसांना एकप्रकारे आवाहन दिले आहे.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## शिवप्रेमींची मोटारसायकल २०० फुट दरीत कोसळली

ग्रामीण रूगणालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरु असल्याचे समजते. आज महाराष्ट्रात सगळीकडे शिवजयंती अगदी मोठ्या उत्साहात सुरू आहे. पण अशा घटना घडत असल्यामुळे अनेक ठिकाणी शिवजयंतीच्या ठिकाणी दु:ख व्यक्त करण्यात येत आहे. कालपासून महाराष्ट्रात अशा अनेक दुर्देवी घटना घडल्या आहेत. केतन देसाई २३, प्रथमेश गरुड २५ आणि किरण सुर्यवंशी २० हे तरूण गाडीवरून पडल्यामुळे जखमी झाले आहेत. त्यावेळी घाटाचा अंदाज न आल्याने तिघेही दरीत कोसळले. त्यावेळी तिथं उपस्थित असलेल्यांनी त्यांना जवळच्या ग्रामीण रूग्णालयात दाखल करण्यात केले. एकाला किरकोळ लागले असल्याने प्राथमिक उपचार करून सोडून देण्यात आले आहे, दोघेजण तिथल्या ग्रामीण रूग्णालयात उपचार घेत आहेत.

महाड औद्योगिक वसाहत पोलिसांनी दिलेली माहिती भोर येथुन रायगडकडे शिवज्योत आणण्यासाठी मोटर सायकलवर ट्रिपल सिट निघालेल्या शिवभक्तांच्या मोटरसायकलला आज पहाटे ३.३० वाजण्याच्या सुमारास वरंध घाटात कावळे किल्ल्या जवळ अपघात झाला. मोटर सायकल सुमारे २०० फुट दरीत कोसळली. या अपघातामध्ये तीन तरुण जखमी झाले आहेत. केतन देसाई २३, प्रथमेश गरुड २५ आणि किरण सुर्यवंशी २० सर्व राहणार भोंगवली तालुका भोर अशी जखमींची नाव आहेत. त्यापैकी दोघांवर महाडच्या ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू असुन एकाला प्रथोमोपचार करून घरी पाठविण्यात आले आहे. महाड औद्योगिक वसाहत पोलिस आणि स्थानिक नागरिकांनी बचाव कार्य करीत जखमींचे प्राण वाचवले असल्याचे तिथल्या स्थानिक पोलिसांनी सांगितले आहे.

## शिवजयंतीच्या निमित्ताने रूग्णवाहिका लोकार्पण सोहळा

अनिल बंडगर, कार्याध्यक्ष योगेश कोटेकर, शेकाप महिला आघाडी अध्यक्ष सौ.दर्शना भडांगे, शेकाप महिला आघाडीच्या माधुरी गोसावी, शेकाप महिला आघाडी पदाधिकारी, ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ना नफा, ना तोटा या तत्त्वावर सुरू केलेल्या रुग्णवाहिका सेवेबद्दल ज्येष्ठ नागरिकांनी समाधान व्यक्त केले आजची तरुण युवा पिढी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे लोकआग्रहा खातिर सामाजिक बांधिलकीतून असे लोकोपयोगी उपक्रम हाती घेत आहे याचे आम्हाला नक्कीच कौतुक आहे. जे एम म्हात्रे चॅरिटेबल संस्थेच्या माध्यमातून पनवेल परिसरात नेहमीच ज्येष्ठ नागरिक आणि महिला तसेच युवकांसाठी वेगवेगळ्या प्रकारचे सामाजिक उपक्रम राबवले जातात बऱ्याच लोकांना त्याचा लाभ होतो यापुढेही असे उपक्रम सुरू राहण्यासाठी त्यांनी शुभेच्छा दिल्या.

## उलवा नोडमध्ये उभा राहणार शिव छत्रपतींचा भव्य दिव्य अश्वारूढ पुतळा

अमर म्हात्रे, किशोर पाटील, संजय भगत, तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्यने उपस्थित होते.

स्व. जनार्दन भगत साहेबांच्या संकल्पनेतून १९८१ साली महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांचा अर्धपुतळा उभारला गेला व तत्कालीन विरोधी पक्षनेते शरद पवार यांच्या हस्ते, तसेच स्वर्गीय दि. बा. पाटील, दत्तूशेठ पाटील, एन. डी. पाटील यांच्या उपस्थितीत अर्धपुतळ्याचे अनावरण संपन्न झाले होते. या पुतळ्यास आता तब्बल ४० वर्ष होत आहेत. गव्हाण विभागातून एस्सार, ओ. एन. जी. सी. माझगांव डॉक, १९८४ सालचा गौरवशाली - शौर्यशाली लढा व अनेक लढ्यांचे नेतृत्व करताना स्व. जनार्दन भगत साहेबांनी कोपर फाट्यावरील शिव छत्रपतींच्या पुतळ्याला अभिवादन करून अनेक लढे यशस्वी केले व कष्टकरी, शेतकरी, कामगारांना न्याय मिळवून दिला. अनेक लढ्यांचा साक्षीदार असलेल्या पुतळ्याची ४१ वर्ष सातत्याने ऊन पावसाचा परिणाम होऊन क्षति झालेली आहे. म्हणून गव्हाण विभागातील शिवछत्रपती स्मारक व उत्सव समितीचे नेते माजी खासदार रामशेठ ठाकूर, महेंद्र घरत यांनी छत्रपतींचा भव्यदिव्य अश्वारूढ पुतळा नव्याने विकसित होत असलेल्या उलवा नोड मध्ये उभा करण्याचा संकल्प मांडला व सिडको व्यवस्थापनाबरोबर अनेक वर्ष संघर्ष करून खारकोपर स्टेशन समोर सव्वा सहा एकर जागा मंजूर करून घेतली. यामध्ये सिडकोचे तत्कालीन चेअरमन आमदार प्रशांत ठाकूर यांचा सिंहाचा वाटा आहे. लवकरच या जागेवर शिवसृष्टी व शिवरायांचा अश्वारूढ पुतळा उभारण्याच्या कामाला सुरुवात होणार आहे.

# कर्ज थकवून डंपरची केली दुसऱ्याला विक्री

**दै.रायगड नगरी । पनवेल**

वीस लाख ७८ हजार रुपयांचे कर्ज थकीत करून डंपरची परस्पर दुसऱ्यास विक्री केल्याप्रकरणी अब्दुल कादिर सय्यद (वय ४९) त्याच्याविरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोयंजे येथील मनाली दामोदर मोकल यांनी बँकेकडून कर्ज घेऊन खरेदी केलेला डंपर एमएच ४६ बी १३४७ याचा अब्दुल कादिर सय्यद याच्यासोबत विक्रीचा व्यवहार केला. व डंपरच्या कर्जाचे हप्ते अब्दुल सय्यद याने भरण्याचे ठरवून कर्ज हे मनाली मोकल यांचे नाव ठेवले. दोघांमध्ये नोटरी करारनामा करून डंपर अब्दुल सय्यद यांच्या ताब्यात देण्यात आला. अब्दुल कादिर सय्यद याने मागील थकलेले हप्ते भरले. मात्र त्यानंतर कर्जाचा एकही हप्ता भरला नसल्याने मनाली मोकल यांना फायनान्स कंपनीकडून वारंवार नोटिसा होऊ लागल्या. त्यामुळे मनाली मोकल यांनी अब्दुल सय्यद याला फोन केला असता त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली. व त्यांच्या नावावरील २० लाख ७८ हजार रुपयांचे कर्ज थकीत करून डंपर परत दिला नाही. त्याची दुसऱ्याला परस्पर विक्री केली. याप्रकरणी अब्दुल कादिर सय्यद त्याच्या विरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला.


अर्जदाराचे वकील
ॲड.रोहिदास आगलावे

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो. यांचे न्यायालयात
फौ.चौ.अर्ज क्र.१९६/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.२९/०३/२०२२

श्री.पदमाकर धर्मा पाटील
वय : ३६ वर्षे, धंदा : नोकरी
रा.मु.केवाळे, पोस्ट मोरबे,
ता.पनवेल, जि.रायगड, महाराष्ट्र ४१०२०६ — अर्जदार
विरुद्ध
निबंधक विवाह / जन्म मृत्यू नोंदणी/
ग्रामसेवक, ग्रामपंचायत केवाळे,
ता.पनवेल, जि.रायगड महाराष्ट्र ४१०२०६ — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार यांची आई कै.रामुबाई धर्मा पाटील यांचा मृत्यू दि.२७/०५/१९९२ रोजी राहत्या घरी केवाळे या मुक्कामी झालेला आहे. अर्जदार यांनी त्यांच्या आईच्या मृत्यूची नोंद होण्याकरिता पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांच्या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

कै.रामुबाई धर्मा पाटील यांचा मृत्यू, वरील नमूद केलेल्या ठिकाणी झालेला आहे. त्याबद्दल कोणास काही कळविण्याचे असेल व सदरहू अर्जास कोणाची काही हरकत असेल, तर ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत त्याांनी या न्यायालयात हजर राहून कायदेशीर हरकती नोंदविण्याच्या आहेत. या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत योग्य हरकती न आल्यास सदरहू व्यक्तीच्या मृत्यूची नोंदणी करण्याचे आदेश संबंधितांना देईल. आज दि.१६/०२/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्याायलयाच्या शिक्क्यानिशी दिली आहे.

**सही/-** **क.लिपीक** **फौ.न्या.क.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **फौ.न्या.क.स्तर, पनवेल**


स्व. श्री साई नारायणबाबा यांच्या ८६ व्या जयंतीनिमित्त

# सामूहिक विवाहासह निराधार माताभगिनींना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल येथील सुप्रसिद्ध अशा साईबाबा मंदिराचे स्व. श्री साई नारायणबाबा यांच्या ८६ व्या जयंतीनिमित्त आज सामूहिक विवाहासह निराधार माता भगिनींना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप पनवेल महानगरपालिकेच्या महापौर डॉ. कविता चौतमोल यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

गेल्या अनेक वर्षांपासून श्री नारायणबाबा चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून सद्गुरू श्री साई नारायण बाबा यांच्या आशीर्वादाने सामूहिक विवाह सह निराधार माता भगिनींना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले. आजही त्यांच्या ८६ व्या जयंतीनिमित्त दोन दिवसीय आयोजित कार्यक्रमात पनवेल महानगरपालिकेच्या महापौर डॉ. कविता चौतमोल यांच्या शुभहस्ते निराधार माता भगिनींना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले. तसेच सामूहिक विवाह सोहळ्यात उपस्थित असलेल्या वधू वरांना त्यांनी आशीर्वाद व शुभेच्छा दिल्या. यावेळी ट्रस्टचे चेअरमन खेमचंद गोपलानी, को-ऑर्डिनेटर राम थदानी, सचिव रामलाल चौधरी, ज्येष्ठ पत्रकार गणेश कोळी, संजय कदम यांच्यासह इतर अनेक मान्यवर या कार्यक्रमात सहभागी होते. यावेळी बोलताना महापौर डॉ. कविता चौतमोल यांनी सांगितले की, या मंदिर व ट्रस्टच्या माध्यमातून सामूहिक शास्त्रयुक्त कन्यादान हा उपक्रम राबविला जात आहे. यात वधु वरांना सोन्याचे मंगळसूत्र, सोन्याची अंगठी व संसाराला लागणाऱ्या सर्व वस्तू या देण्यात येत आहेत. त्याचप्रमाणे निराधार विधवा, माता भगिनींना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप दरमहिन्याला करण्यात येते तसेच आजही करण्यात आले आहे. नारायणबाबा आज आपल्यात नसले तरी त्यांचे आशीर्वाद व त्यांनी सांगितलेले उपदेशपर मार्गदर्शन बरोबर आहे. त्यांनी आखून दिलेल्या समाजसेवेच्या मार्गावर सर्वांनी चालून गोरगरिबांना मदत करावी असे आवाहन यावेळी त्यांनी केले.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## भिंगारीमध्ये शिवजयंती उत्साहात साजरी



**दै.रायगड नगरी । पनवेल**

भिंगारी मध्ये शिवजयंती मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आली. यावेळी युवासेना विभाग प्रमुख अमोल गोवारी, अलंकार कुंभार, रणजित परदेशी, राकेश ठाकूर, सुरज मंडळ, रवी परदेशी, प्रीतम पवणे, साहिल मिसाळ, श्याम परदेशी, कृष्णा कांबळे, हृतिक परदेशी, लखन बोरे, आणि शिवसैनिक उपस्थित होते.

## बोरगाव ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी सुधीर पाटील बिनविरोध



**दै.रायगड नगरी । पेण**

पेण तालुक्यांतील निसर्गरम्य असलेल्या बोरगांव ग्रामपंचायतीच्या नवनिर्वाचित सरपंच पदी सुधीर पाटील यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. याआधीचे सरपंच यांनी राजीनामा दिल्याने हे पद रिक्त झाले होते. त्यानंतर आज सरपंच पदासाठी निवडणूक घेण्यात आली. चार वर्षांपूर्वीही बोरगाव ग्रामपंचायत बिनविरोध झाली होती.

यावेळी जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा निलिमा पाटील, जिल्हा परिषद सदस्य डी.बी.पाटील, ग्रामपंचायत सदस्य सुशांत खाकर, काशिनाथ केवारी, सोमी केदारी, सोमा पारधी, संगिता वाघमारे, सीता वाघमारे, सुशिला पाटील, मधुरा महाडिक, ग्रामसेवक गणेश पाटील यांच्यासह हरेश पाटील, सचिन बेलकडे, ललित ढाकवल, माजी पोलिस पाटील भास्कर पाटील आदी उपस्थित होते. यावेळी बोलताना सरपंच सुधीर पाटील यांनी सांगितले की, माझी सर्वानुमते बिनविरोध सरपंच म्हणून निवड झाली आहे. गावच्या विकासासाठी तरुणांना सोबत घेऊन पुढची वाटचाल करणार आहे. गावाची शांतता भंग न होता गाव एकसंघी ठेवणार आहे. आपल्या सरपंच पदाच्या काळात गावासह परिसराचा विकास करण्याचा निश्चितपणे प्रयत्न करु असे नवनिर्वाचित सरपंच पाटील यांनी बोलताना सांगितले.

# आदिवासी बांधवांना विविध दाखल्यांचे वाटप विविध ९९४ दाखल्यांचे वाटप

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत तालुक्यात कातकरी उत्थान व सप्तसूत्री अंतर्गत कातकरी आणि आदिवासी बांधवांना विविध प्रकारच्या ९९४ दाखल्यांचे वाटप करण्यात आले.



रायगड जिल्हा हा पश्चिमेकडील अरबी समुद्र व पूर्वेकडील सह्याद्रीच्या डोंगर रांगा यामुळे भौगोलिक दृष्ट्या वैशिष्ट्यपूर्ण आहे, रायगड जिल्ह्याच्या एकूण लोकसंख्येपैकी ११.५८ टक्के लोकसंख्या आदिवासी बांधवांची आहे, त्यापैकी ४० टक्के लोकसंख्या कातकरी बांधवांची आहे, शासन स्तरावरून आदिवासींचा आर्थिक सामाजिक विकास करण्याकरिता अनेक योजना राबवल्या जातात परंतु तरीही आदिवासी बांधव अनेक सोयी सुविधांपासून वंचित आहेत, रायगड जिल्ह्यामध्ये आदिवासी बांधवांचा सर्वांगीण विकास साधण्याच्या दृष्टिकोनातून एक सप्तसूत्री निश्चित करण्यात येत आहे, त्या माध्यमातून आदिवासींच्या कल्याणकारी योजनांचे मार्गदर्शन व नियंत्रण केले जाणार आहे.

आदिवासी बांधवांकरता अस्तित्वात असलेल्या सर्व योजनांचा लाभ त्यांना मिळण्याकरिता शासनाच्या सर्व विभागाचा समन्वय असणे आवश्यक आहे, याकरिता जिल्हा स्तरावर जिल्हा आदिवासी कल्याणकारी समन्वय समिती, तालुकास्तरावर तालुका आदिवासी कल्याणकारी समन्वय समिती व ग्रामपंचायत स्तरावर ग्राम आदिवासी कल्याणकारी समन्वय समिती अशा तीन समित्यांची स्थापना करण्यात आल्या आहेत

रायगड जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली कर्जत तालुक्यात कर्जत येथे कातकरी उत्थान व सप्तसूत्री अंतर्गत उपविभागीय अधिकारी (प्रांत) अजित नैराळे यांच्या हस्ते कातकरी आणि आदिवासी बांधवांना ९९४ विविध प्रकारच्या दाखल्यांचे वाटप करण्यात आले, प्रसंगी कर्जत तहसीलदार विक्रम देशमुख, नायब तहसीलदार सुधाकर राठोड, पुरवठा विभाग नायब तहसीलदार बी. टी. बुरसे उपस्थित होते.यावेळी जातीचे प्रमाणपत्र – ४५९, रेशन कार्ड – १७०, रहिवासी दाखले – १९२, उत्पन्नाचे दाखले – १७३ असे एकूण ९९४ दाखले वाटप करण्यात आले अशी माहिती तहसीलदार विक्रम देशमुख यांनी दिली.

# तळा शहरात अवतरली शिवशाही ; शिवजयंतीचा उत्साह शिगेला

**दै.रायगड नगरी । तळा**

तळा शहरात शिवजयंतीचा उत्साह शिगेला पोहचला असल्याचे चित्र पहायला मिळाले. शिवकालीन मर्दानी खेळ, लाठी काठी, लेझीम, मशाल महोत्सव, भव्य मिरवणूक आशा विविध कार्यक्रमांनी तळा शहरात शिवजन्मोत्सव साजरा करण्यात आला.



या प्रसंगी आमदार अनिकेत तटकरे, तळा नगराध्यक्षा अस्मिता भोरावकर, उपनगराध्यक्ष चंद्रकांत रोडे, नगरसेवक मंगेश शिगवण, प्रकाश गायकवाड, चंद्रकांत भोरावकर, विजय तांबे, मंगेश देशमुख, महेंद्र कजबजे, राकेश नांदगावकर, श्रीराम कजबजे, निलेश कदम अनेक मान्यवर शिक्षक, शिक्षके तर कर्मचारी विद्यार्थी उपस्थित होते. सकाळी १० वा गो.म.वेदक विद्यामंदिर येथून भव्य मिरवणुकीला सुरुवात होऊन संपूर्ण शहरातून हायस्कूल मध्ये समारोप करण्यात आली. या मिरवणुकीत महाराजांची वेशभूषा केलेला विद्यार्थी, आजूबाजूला भगवे झेंडे हातात घेऊन उभे असलेले मावळे, लेझीम पथक, लाठी काठी, दांनपट्टा, बाणा फिरविणारे विद्यार्थी व सर्वत्र छत्रपती शिवाजी महाराज की जय, जय भवानी जय शिवाजी चा जय जयकार आसमंत दुमदुमून गेला या सर्व दृष्यांमुळे तळा शहरातील नागरिकांना जणू काही शिवशाही अवतरल्याचै वातावरणात भासत होते.

तळा तालुक्यात विविध ठिकाणी जाणता राजाचा जन्मोत्सव सांस्कृतिक कार्यक्रम करून साजरा करण्यात आला. प्राथमिक शाळा, शासकीय कार्यालय, नगरपंचायत कॉलेज, महाविद्यालय तर शिवप्रेमींनी आपल्या देवघरात देखील शिवरायांची पुजा, आरती, पुष्पहार अर्पण करून जयघोष केला. तळगड किल्ल्यावर शिवजयंती मी शिवभक्त प्रतिष्ठानच्या सदस्यांनी प्रतिवर्षा प्रमाणे साजरी केली. संपूर्ण किल्ल्याची साफ सफाई रंगरंगोटी भगव्या झेंड्यांनी सजवला होता. सकाळी ७ वा.गडपुजन, ध्वज पूजन, ध्वजारोहण, महादेवाचे पुजन, शिवप्रतिमेचे पुजन अशा विविध कार्यक्रमाचे आयोजन केले होते. रात्री सात वाजताच्या सुमारास संपूर्ण तळगडावर मशाली पेटविण्यात आल्या. यामुळे तळा वासियांना संपूर्ण तळगड मशालींनी उजळलेला पाहायला मिळाला.

# छत्रपती शिवाजी महाराज जयंती पनवेल शहर महावितरण उपविभाग येथे उत्साहात साजरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

छत्रपती शिवाजी महाराज जयंती पनवेल शहर महावितरण उपविभाग येथे उत्सवात साजरी करण्यात आली. यावेळी छत्रपती शिवरायांना पुष्पमाला अर्पण करण्यात आली तसेच शिवरायांचा जयघोष करण्यात आला.

थोर महापुरुषांचा आदर्श डोळ्यासमोर ठेऊन महावितरण कंपनी ग्राहक सेवेसाठी सदैव तत्पर असते. तसेच सर्व कर्मचारी सुद्धा आपलेच आहेत. आपल्या सोबत सेवेसाठी असल्याचे सहाय्यक अभियंता डी के मोरे यांनी यावेळी बोलताना सांगितले. याप्रसंगी सहाय्यक अभियंता किरण चौधरी, सहाय्यक अभियंता मंदार सावंत, यंत्रचालक भोसले, इतर कर्मचारी, बाह्य स्त्रोत कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# माथेरानचे शिक्षक संघपाल वाठोरे गुणीजन शिक्षकरत्न या राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित

**दै.रायगड नगरी । माथेरान**

मुंबई शहरातील गुणिजन गौरव महासंमेलनात माथेरानचे शिक्षक संघपाल वाठोरे गुणिजन शिक्षकरत्न या राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.मंगळवार दिनांक १५ फेब्रुवारी रोजी मनुष्यबळ विकास लोकसेवा अकादमी (रजि. ट्रस्ट) संस्थेच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय गुणिजन गौरव महासंमेलन आणि पुरस्कार वितरण सोहळा मुंबई शहरातील दादर माटुंगा सांस्कृतिक केंद्र , सोशल हॉल, दादर येथे थाटात संपन्न झाला. महाराष्ट्र राज्यातील सर्व जिल्ह्यातील २५ क्षेत्रांतून पुरस्कारासाठी निवडलेल्या १०१ मानकऱ्यांना या सोहळ्यात सन्मानित करण्यात आले.

माथेरानच्या सरस्वती विद्यामंदिर या माध्यमिक शाळेत शिक्षक असलेल्या संघपाल भिमराव वाठोरे यांना या समारंभात राज्यस्तरीय गुणिजन गुरुगौरव शिक्षकरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. मानाचा फेटा, मानकरी बॅच, महावस्त्र, गौरवपदक,सन्मानचिन्ह आणि मानपत्र या स्वरूपात राज्यस्तरीय पुरस्कार थाटात प्रदान करण्यात आले. सुप्रसिद्ध राष्ट्रीय कीर्तनकार ह. भ. प. श्री. श्यामसुंदर महाराज सोन्नर हे सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून केलेल्या बीजभाषणात त्यांनी पुरस्कार मानकरी गुणवंतांनी भारतीय संविधानाला अपेक्षित अशी स्वातंत्र्य, समता आणि बंधुता हि मूल्ये समाजात खोलवर रुजविण्यासाठी पथदर्शी प्रकल्प राबविण्याचे आवाहन केले. सुप्रसिध्द साहित्यिक रमेश आव्हाड हे या समारंभाचे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. सुप्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ आणि इंटरनॅशनल एज्युकेशन आयकॉन हेमाली जोशी आणि जगप्रसिद्ध कलाकार महालक्ष्मी वानखेडकर या विशेष पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. समारंभाचे सूत्रसंचालन सुप्रसिद्ध प्रेरक वक्त्या मनिषा कदम यांनी केले. गुणिजन परिवाराचे पदाधिकारी प्रकाश सावंत, लक्ष्मणराव दाते, अमोलराव सुपेकर यावेळी उपस्थित होते. समारंभ अध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक रमेश आव्हाड यांनी उपस्थितांना ग्लोबल गुणिजन शपथ प्रदान केली आणि गुणिजन संसदेत पुरस्कार प्राप्त मानकऱ्यांच्या अभिनंदनाचा ठराव मांडला. राज्यस्तरीय पुरस्कार वितरणासोबतच १५ गुणवंताना राष्ट्रस्तरीय प्रतिभा सम्मान पुरस्कार २०२२ चे थाटात वितरण करण्यात आले. या राष्ट्रस्तरीय पुरस्कार वितरणाला प्रमुख पाहुण्या म्हणून डॉ. जयलक्ष्मी सानिपीना राव या आंध्रप्रदेश राज्यातून उपस्थित होत्या. विविध क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करून पुरस्कारास पात्र ठरलेल्या मानकरी गुणिजनांचे त्यांनी आपल्या भाषणात कौतुक केले. वर्ष १९९९ मध्ये स्थापन झालेल्या मनुष्यबळ विकास लोकसेवा अकादमी या गुणिजन संस्थेचा हा २१ व्या वर्षातील पुरस्कार सोहळा होता. पुरस्कार प्रेरणा देतात; प्रेरणेने राष्ट्र मोठे होते! या ब्रीदवाक्यावर कार्यरत ही संस्था राज्यस्तरीय, राष्ट्रस्तरीय आणि विदेशस्तरीय पुरस्कार उपक्रम आयोजित करीत असते. शिक्षक संघपाल वाठोरे यांना गुणिजन शिक्षकरत्न या राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आल्यामुळे त्यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे तर येथील वीर हुतात्मा भाई कोतवाल प्राथमिक शाळेच्या शिक्षकांसह विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.



# भंडारी युवक कार्यकर्ते आयोजित भव्य शिवजयंती पालखी सोहळा



**दै.रायगड नगरी । मुरुड**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त मुरुड भंडारवाडा भंडारी युवक कार्यकर्ते आयोजित भव्यदिव्य शिवप्रतिमेची पालखी मिरवणूक काढण्यात आली. यावेळी लहान मुलांनी महाराजांची व मावळ्यांची वेशभूषा साकारली होती.

मुरुड भंडारवाडा येथिल भंडारी युवक कार्यकर्त्यांनी सालाबादप्रमाणे यंदाही शिवजयंतीच्या निमित्ताने शिवप्रतीमेच्या भव्यदिव्य पालखी सोहळ्याचे आयोजन केले होते. या पालखी सोहळ्याचे यंदा तिसरे वर्ष होते. या सोहळ्यासाठी शेकडो शिवप्रेमी उपस्थित होते. सदर पालखी मिरवणूक भंडारवाडा येथून सुरू झाली ती श्री काळभैरव मंदिर येथे जाऊन बाजारपेठेतून पुन्हा भंडारवाडा येथे जाऊन समाप्त करण्यात आली.

या कार्यक्रमाला अनेक मान्यवर उपस्थित होते. माजी नगराध्यक्षा स्नेहा पाटील, नगरसेविका मेघाली पाटील, इतर पदाधिकारी उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी भंडारी युवक कार्यकर्त्यांनी खुप परिश्रम घेतले.

# दोन लाख २३ हजार रुपयांच्या मोबाईलची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

वेअर हाऊस मधील दोन लाख २३ हजार ९७७ रुपयांचे मोबाईल चोरी केलयाप्रकरणी अक्षय भोपी (२३), सेक्टर ९, नवीन पनवेल याच्याविरोधात कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

एन्टेक्स ट्रांसपोर्टेशन सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड कंपनीचे वेअर हाऊस सेक्टर ३६, कामोठे येथे आहे. फ्लिपकार्ट वर बुक केलेल्या सर्व प्रकारच्या वस्तू या कंपनीच्या वेअरहाऊसमध्ये येत असतात. या वस्तू ते कामोठे हद्दीत डिलिव्हरी करत असतात. त्यांच्या कार्यालयामधून शिपमेंट मोबाईल गहाळ होत असल्याचे मॅनेजरला समजले. यावेळी त्यांनी स्टाफकडे चौकशी केली असता आणि रेकॉर्ड तपासले असता दोन लाख २३ हजार ९७३ रुपये किमतीचे मोबाईल गहाळ झाल्याचे समजले. शिपमेंट डिलिव्हरीचे काम करणारा अक्षय भोपी त्याच्याकडे मोबाईलची चौकशी केली असता त्याने मोबाईल चोरल्याचे कबूल केले. कामोठे पोलीस ठाण्यात याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

# बेथनी स्कूलमध्ये शिवजयंती निमित्त विविध कार्यक्रम



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेलमध्ये कोळखे या ठिकाणी बेथनी स्कूल मध्ये शिव–ाजी महाराजांची जयंती निमित्ताने विद्यार्थ्यांनी नुत्य साकारले तसेच प्रिन्सिपल मॅडम सी. शालेट यांनी शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला हार दीप प्रज्वलन आरती करून कार्यक्रमाचे शोभा वाढवली तसेच विद्यार्थ्यांना शिवाजी महाराजांच्या जयंतीची माहिती दिली.

उपस्थित असणारे शाळेचे शिक्षक गोपाल सभादिंडे स्वप्निल फराट जीवन पाटील रोशन घरत किरीट सर अजित सर राजू कोळी आशिष सर शिक्षकांच्या उपस्थिती मध्ये शिवाजी महाराजांची जयंती साजरी केली.


## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल श्री.रोहिदास रामा संते, वय : ५१ वर्षे, व्यवसाय : शेती, रा.श्री समर्थ कृपा, कोळेगांव, पो.निळजे, ता.कल्याण, जि.ठाणे यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमूद असलेल्या मालकांकडून कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहाण, दान, लिज, बक्षिसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकरचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधित व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरुपात खालील नमूद पत्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पूर्ण करतील. मुदतबाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे : बार्डी, ता.कर्जत, जि.रायगड येथील शेतजमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | | | आकार | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | हे. | आर. | पॉ. | रुपये | पैसे |
| श्री.मधुकर मारुती कांबरी वगैरे | ६ | १ | ० | ८० | ० | ४ | ४५ |
| | वरील क्षेत्रापैकी हे.आर.पॉ. ०–१७–०० इतके क्षेत्र | | | | | | |

येणेप्रमाणे जााहीर नोटीस आहे

कार्यालयीन पत्ता : मु.उक्रुळ, पो.चिंचवली, ता.कर्जत, जि.रायगड ४१०२०१

सही/–
अॅड.जयेश संभाजी म्हसे
दिनांक : १९/०२/२०२२
मो.नं.९०२८९८२२७७

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, मौजे : कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालीलप्रमाणे वर्णन केलेली दुकान मिळकत या मिळकतीसमोर लिहिलेल्या कब्जेदारांकडून आमचे अशिल हे सदरची मिळकत कायम खरेदी घेण्याच्या विचारात आहेत. तरी सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :–

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड**

| मालक/कब्जेदारांचे नाव | दुकान क्र. | क्षेत्र | मौजे |
|---|---|---|---|
| श्री.इकबाल अहमद देदराणी | एफ–३० | ६१.९७ चौ.मी. अधिक १०.२२ चौ.मी. कारपेट एरिया | अमरंते को.हौ. सोसायटी, प्लॉट नं.०४, सेक्टर ०९, कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड |

सदर मिळकत निर्वेध असल्याची वर नमूद विद्यमान मालकांनी दिली आहे. तरी वरील मिळकती बाबतीत अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अटॅचमेंट, लीस, दावा वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क–हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १० दिवसांच्या आत खालील पत्यावर प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रार, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल
दि.१८/०२/२०२२

सही/–
एन. ए. शेख
वकील व नोटरी
शॉप नं.२४, अमन सोसायटी, सेक्टर ५ ई, कळंबोली, नवीमुंबई
मो.नं.९९२०९९६९०९

## जाहीर नोटीस

सर्व तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल १) संदीपकुमार शर्मा २) कोथंडरमण पद्मनाभम ३) शिवकुमार वीरप्पंडीयन ४) सुप्रसाद मेंहदले ५) अमृता सेजवळकर ६) मनोजकुमार चौरसिया ७) दिनेशचंद्र चौरसिया ८) राजेश ह. चौरसिया ९) मुकेश ह. चौरसिया १०) राकेश ह. चौरसिया ११) मनिषकुमार चौरसिया १२) महेंद्र शिवनारायण चौरसिया ऑफिस नं.ए विंग, अगरवाल ट्रेड सेंटर, ऑफिस नं.८५/८६, ८ वा मजला, प्लॉट नं.६२, सेक्टर ११, सीबीडी–बेलापूर, नवी मुंबई–४००६१४. यांनी खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे नागुबाई मुकूंद पाटील हे मालक आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : पुनाडे (विंधणे), ता.उरण, जि.रायगड येथील शेतजमीन मिळकत**

| सर्व्हे नं. हिस्सा नं. | क्षेत्रफळ | पो.खराबा हे.आर.पॉ. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| १३०/८२ अ | ०.१७.५० | ०.०१.७५ | २.५८ |

तरी सदर मिळकतीबाबत होणाऱ्या व्यवहारास कोणीही व्यक्तीची / संस्थेची कोणत्याही स्वरुपाची, हरकत, दावा, तक्रार, दंग, दावा, वहिवाटी हक्क, हितसंबंध, खरेदी, गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, भाडेकरार, वारसा हक्क, पोटगी, लिज, सबलिझ, लिएन, सदर मिळकतीतून जाण्या–येण्याचे वहिवाटी अथवा इजमेंटचे हक्क इत्यादी अगर कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी आपली हरकत लेखी स्वरुपात ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांचे आत खााली दिलेल्या पत्यावर कळवावी. या मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास ही मिळकत निर्वेध व बोजारहीत असल्याचे समजून आमचे अशिल सदर वर नमूद मिळकतीच्या मालकाशी खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर कोणाचीही तक्रार आल्यास ती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

बेलापूर
दि.२०/०२/२०२२

सही/–
अॅड.टी.एन.त्रिपाठी
(हायकोर्ट)
ऑफिस पत्ता : ए विंग, अगवाल ट्रेड सेंटर, ऑफिस नं.८५/८६, ८ वा मजला, प्लॉट नं.६२, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई–४००६१४

# संक्षिप्त...


## को.ए.सो. के.वी.कन्या विद्यालय शिवजयंती उत्सव



**दै.रायगड नगरी । पनवेल**

को ए सो के वी कन्या विद्यालय पनवेल मध्ये छत्रपती शिवाजी महाराज जयंतीउत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. त्यानिमित्ताने वेगवेगळ्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले होते. या कार्यक्रमासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका, शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी आवर्जून उपस्थित होते

## छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त जिल्हा प्रशासनाचे अभिवादन



**दै.रायगड नगरी । अलिबाग**

महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून तहसीलदार विशाल दौंडकर यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन केले. यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयातील इतर अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

## वाहनाच्या धडकेने वृद्ध इसमाचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । पनवेल**

जनार्दन कुरंगळे (वय-७१, रा.-भिंगार) हे साखरपूडा आटपून आपल्या घरी त्यांच्या ताब्यात असलेल्या एक्टीव्हा स्कूटर नं.-एमएच ४६ एडब्लू ५८३३ वरून ते घरी येत असताना राहुल पार्क हॉटेलसमोर त्यांच्या गाडीस अज्ञात वाहनाची ठोकर बसल्याने झालेल्या अपघातात त्यांचा दुर्दैवी मृत्यु झाला आहे. या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

# श्रीवर्धनमधील म्हाब्धा घाटातील जंगलात वणवा

### वनविभागाच्या उदासीन धोरणामुळे तात्काळ उपाययोजना नाहीच

**दै.रायगड नगरी । दिघी**

श्रीवर्धन तालुक्यातील वावेपंचतन हद्दीतील रस्त्यालगत असलेल्या जंगलात वणवा लागल्याने कित्येक लहान मोठी झाडे जळून नष्ट झाली आहेत. येथील वनविभागाच्या दोन हेक्टर क्षेत्रातील डोंगराला लागलेल्या वणव्यात पशु पक्षी, सरपटणारे प्राण्यांसह जनावरांचा चारा नष्ट झाला आहे. यावेळी मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याची घटना घडली असताना वन विभाग याकडे दुर्लक्ष करीत असल्याची बाब समोर आली आहे.



वावेपंचतन परिसरातील म्हाब्धा घाटातील वनविभागाच्या हद्दीत गुरुवारी दुपारच्या सुमारास वणवा लागला. या वणव्यात जवळपास दोन ते तीन हेक्टर परिसर जळून खाक झाल्याचे प्रत्यक्षदर्शीने सांगितले. वन विभाच्या ढिसाळ कारभारामुळे जाळपट्टे काढले जात नाहीत, यामुळे डोंगरच्या डोंगर आणि वनविभागाच्या हद्दीतील झाडे या वणव्यांच्या भक्षस्थानी पडत असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे. येथे दिवसा लागलेल्या वनव्याकडे वनविभागाचे कर्मचारी फिरकलेच नाही. शासन एकीकडे झाडे लावण्यासाठी प्रचंड अनुदान देते यासाठी जनजागृती करीत वृक्ष लावगड करते आणि दुसरीकडे त्याची जोपासना करणारे वनविभागात काम करणारे कर्मचारी याकडे मोठे दुर्लक्ष करीत आहेत. त्यामुळे जंगलसंपत्तीचे मोठे नुकसान होत आहे. शासन दरवर्षी वणवे लागू नये यासाठी मोठ्या प्रमाणात सूचना देते. जाळपट्टे काढण्यासाठी निधी देते, मात्र जाळपट्टे वेळेत आणि आवश्यक त्या ठिकाणी काढले जात नसल्याने वणवे लागण्याची प्रमाण वाढत आहे.

## नगरपंचायत पोलादपूरचे कार्यालय कुलूपबंद



**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

नगरपंचायत पोलादपूरचे कार्यालय छत्रपती शिवाजी महार-ाज जयंती उत्सवानिमित्त छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन करण्यासाठी खुले असेल, अशी अपेक्षा करून काँग्रेस पक्षाचे नवनिर्वाचित नगरसेवक सकाळी साडेदहा वाजता पुष्पहार घेऊन कार्यालयाकडे गेले असता त्यांना नगरपंचायत पोलादपूरचे कार्यालये कुलूपबंद असल्याचे आढळून आले.

याप्रसंगी नगरसेविका आशा गायकवाड, नगरसेवक स्वप्नील भुवड, स्वीकृत नगरसेवक संतोष चव्हाण यांनी कार्यालयाच्या कुलूपबंद दरवाजालाच पुष्पहार अर्पण केला. यावेळी नगरसेवक स्वप्निल भुवड यांनी प्रशासनाचा तीव्र शब्दांत निषेध व्यक्त केला. याप्रसंगी ॲड. सचिन गायकवाड, काँग्रेस शहराध्यक्ष अमोल भुवड उपस्थित होते.

याबाबत प्रस्तुत प्रतिनिधीने अधिक माहिती घेतली असता छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन करण्याचा कार्यक्रम उपनगराध्यक्ष नागेश पवार यांच्याहस्ते व नगरपंचायत कर्मचारी यांच्या उपस्थितीत सकाळी साडेनऊ वाजण्याच्या सुमारास आटोपून सत्ताध-ारी नगरसेवक निघून गेल्याचे मुख्याधिकारी महादेव रोडगे यांनी सांगितले.

## विक्रांत पाटील यांनी शिवजयंतीनिमित्त आणली रायगडावरून शिवज्योत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिकेचे मा. उपमहापौर व भाजपा युवामोर्चा महाराष्ट्र राज्य प्रदेशाध्यक्ष विक्रांत बाळासाहेब पाटील यांनी सालाबादाप्रमाणे यंदाही शिवजयंतीनिमित्त थेट रायगडावरून शिवज्योत आणली होती.

सदर शिवज्योतीचे पूजन आज सकाळी मा. उपमहापौर विक्रांत बाळासाहेब पाटील यांनी केले व त्यानंतर ती सर्व नागरिकांच्या दर्शनासाठी उप-लब्ध करून देण्यात आली होती. यावेळी मोठ्या संख्येने शिवभक्त उपस्थित होते. ढोल ताशांच्या गजरात वाजत गाजत ही शिवज्योत आणण्यात आली. पायोनिअर विभागातील जनसंपर्क कार्यालयाजवळ आकर्षक अशी सजावट करून छत्रपती शिवरायांच्या मूर्ती शेजारी ही ज्योत अखंड तेवत ठेवण्यात आली होती. तिचे पूजन परिसरातील नागरिकांनी व ज्येष्ठ नागरिकांनी तसेच माता भगिनींनी मोठ्या जल्लोषात केले.




यावेळी बोलताना विक्रांत पाटील यांनी सांगितले की, छत्रपती शिवाजी महाराजांचे आचार विचार प्रत्यक्षात अवलंबविणे गरजेचे आहे. आज खऱ्या अर्थाने छत्रपती शिवरायांच्या विचारांची समाजाला गरज आहे. खऱ्या अर्थाने तो रयतेचा राजा असल्याने त्याचे पूजन दररोज प्रत्येकाच्या घरात होणे गरजेचे असल्याचेही त्यांनी सांगितले.

# माथेरानमध्ये शिवजयंती साजरी

**दै.रायगड नगरी । माथेरान**

शिवाजी महाराज जयंती माथेरान मध्ये उत्साहात साजरी करण्यात आली. येथील नगरपरिषदेच्या सभागृहात छत्रपती शिवरायांना कार्यसम्राट मुख्याधिकारी तथा विद्यमान उत्तम प्रशासक सुरेखा भणगे-शिंदे यांच्या शुभ हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला यावेळी शिवरायांचा जयघोष करण्यात आला.

थोर महापुरुषांचा आदर्श डोळ्यासमोर ठेऊन छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची निर्मिती केली त्या महा पुरुषाला सर्व उपस्थित कर्मचारी वर्गाने अभिवादन केले. यावेळी मुख्याधिकारी सुरेखा भणगे-शिंदे यांच्या सह लिपिक वर्तक, शिपाई उमेश मोरे, लक्ष्मण दरवडा, रामदास धोत्रे आदी उपस्थित होते.



# दुर्ग मावळा प्रतिष्ठान तर्फे द्रोणागिरी किल्ल्यावर शिवजन्मोत्सव साजरा

**दै.रायगड नगरी । उरण**

दुर्ग मावळा प्रतिष्ठान या गड किल्ल्याचे संवर्धन, संरक्षण करणाऱ्या संस्थेतर्फे उरण तालुक्यातील एतिहासिक द्रोणागिरी किल्ल्यावर शिवजयंती निमित्त शिवजन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.१८, १९ फेब्रुवारी २०२२ असे दोन दिवस शिवजन्मोत्सव निमित्त विविध धार्मिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. आगरी कोळी कराडी संघर्ष सामाजिक संस्था, सह्याद्री प्रतिष्ठान उरण विभाग, शिवभक्त प्रतिष्ठान उरण विभाग, शिवशक्ती मित्र मंडळ उरण चारफाटा, योगा विथ पूनम ग्रुप, यान्सी ग्रुप ऑफ लिव्हीस टीम, युवा शिवशक्ती मित्र मंडळ डाऊरनगर, शिवछत्रपती मित्र मंडळ करंजा, अवनी सामाजिक संस्था उरण, डाऊर नगर ग्रामस्थ आणि मित्र परिवार आदी संस्थेचे पदाधिकारी सदस्य या शिवजनमोत्सवात सहभागी झाले होते.

शुक्रवार १८ फेब्रुवारी २०२२ रोजी दुपारी २ वाजता द्रोणागिरी गडाची साफसफाई करण्यात आली. सायंकाळी ५ वा.सर्व शिवभक्त गडावरील कुंडातील पाणी घेऊन खाली उतरले , सायंकाळी ७ वा. विमला तलाव उरण शहर यथे महाराजांच्या मूर्तीला अभ्यंग स्नान घातले. सायंकाळी ८ ते ९:३० दरम्यान द्रोणागिरी गडाबद्दल माहिती आणि इतिहास वर्णन, विमला तलाव येथे दीपोत्सव असे कार्यक्रम घेण्यात आले. १९ फेब्रुवारी २०२२ रोजी सकाळी १० वा. बाळ शिवाजी राजांचा पाळणा हलविण्यात आला. शिवप्रतिमा पूजन, द्रोणागिरी किल्लयावर शिव राज्याभिषेक, दुर्ग पूजन,



पोवाडा, व्याख्यान, मान्यवरांचे स्वागत व शिवभोजन असे उपक्रम पार पडले. सायंकाळी ५ वा. गडावरून सर्वजण खाली उतरले.६ वा. निरोप समारंभ झाला. यावेळी सर्वांचे आभार मानण्यात आले. एकंदरीत दुर्ग मावळा प्रतिष्ठान तर्फे शिवजन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी दुर्ग मावळा प्रतिष्ठान व सर्व सहभागी संस्था, संघटनांनी विशेष मेहनत घेतली.

## पनवेलमध्ये आयपीपीएल; आ.प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते उदघाटन



**दै.रायगड नगरी । पनवेल**

इंटर पनवेल क्रिकेट कमिटी आणि ठाकूर इन्फ्राप्रोजेक्ट्स प्रायव्हेट लिमिटेड कंपनीच्या वतीने शहरातील मिडलक्लास हौसिंग सोसायटीच्या भव्य मैदानावर आयोजित करण्यात आलेल्या आयपीपीएल 'इंटर पनवेल प्रिमियर लीग २०२२' क्रिकेट स्पर्धेला आज(दि. १९) पासून पनवेलमध्ये सुरुवात झाली असून या स्पर्धेचे उदघाटन भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून नगरसेवक अनिल भगत, नितीन पाटील, राजू सोनी, नगरसेविका दर्शना भोईर, माजी उपनगराध्यक्ष मदन कोळी, उल्हास झुंझारराव, प्रशांत झुंझारराव, केदार भगत, स्वप्निल ठाकूर, इंटर पनवेल क्रिकेट कमिटीचे अध्यक्ष सुमित झुंझारराव, उपाध्यक्ष प्रसाद नलावडे, खजिनदार निशांत पावसकर, राजू पटेल, महेश उरणकर, निलेश परदेशी, अश्विन पुजारी, अजय मते, यतीन मानकामे, यांच्यासह क्रिकेटप्रेमी उपस्थित होते. दोन दिवस चालणाऱ्या या स्पर्धेत आठ संघ आपले कसब दाखवणार आहेत. या लीग स्पर्धेतील विजेत्या संघास ०१ लाख रुपये, उपविजेत्या संघास ५० हजार रुपये आणि चषक देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. तसेच या स्पर्धेत मालिकावीर, उत्कृष्ट फलंदाज, उत्कृष्ट गोलंदाज, उत्कृष्ट क्षेत्ररक्षण यांना बक्षिसांनी गौरविण्यात येणार आहे.

## छत्रपती शिवाजी महाराज यांना कर्जत नगरपरिषदेच्या वतीने अभिवादन

**दै.रायगड नगरी । कर्जत**

छत्रपती शिवाजी महाराज यांची आज जयंती कर्जत नगरपरिषदेच्यावतीने त्यांना अभिवादन करण्यात आले.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस नगरपरिषद कार्यालयात नगराध्यक्ष सुवर्णा जोशी व मुख्याधिकारी डॉ. पंकज पाटील यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. याप्रसंगी उपनगराध्यक्ष अशोक ओसवाल यांच्या सह नगरसेवकनगरसेविका उपस्थित होते.



# श्रीवर्धनमध्ये शिवजयंती उत्साहात साजरी

### बोर्लीपंचतन 'जय भवानी जय शिवाजी' गर्जनेने दुमदुमले



**दै.रायगड नगरी । दिघी**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त शनिवारी श्रीवर्धन तालुक्यात मावळा संघटनेतर्फे संपूर्ण तालुक्यात शिवरथ मिरवणूकीचे आयोजन करण्यात आले. गावोगावी विविध कार्यक्रमांनी शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

शिवराय मनामनात शिवजयंती घरा-घरात या संकल्पेने येथील मावळा संघटना गेली पाच वर्ष कार्यरत आहे. श्रीवर्धन मध्ये तिथी प्रमाणे होणारा शिवजयंती उत्सव यावेळी सामाजिक, क्रीडा व सांस्कृतिक उपक्रमाने साजरा करण्यात आला. यामध्ये बोर्लीपंचतन येथे चॅम्पियन कराटे क्लब तर्फे शिवकालीन युद्ध कलेचे प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकडुन आखाडा सादर करण्यात आला. यामध्ये तलवार, भाला, दांडपट्टा, ढाल, विटा, बाणा अशा शस्त्रांचा खेळ पाहून तरुण वर्गात इतिहासा विषयी प्रेम व आपल्या पूर्वजांनी केलेल्या पराक्रमातील आठवणींना उजाळा देण्यात आला. शिवाजी चौकात शिवकालीन युद्ध कलेचे उत्तम सादरीकरण पाहण्यासाठी असंख्य शिवभक्तांनी हजेरी लावली.

शनिवारी बोर्लीपंचतन येथे शिवजयंतीच्या शिवरथाचे प्रारंभ करण्यात झाले. या भव्य मिरवणुकीने शिवाजी चौक येथील शिवरायांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. पुढे बोर्लीपंचतन येथून निघालेल शिवरथ कापोली, शिस्ते, वडवली, दिवे-आगर, खुजारे, दांडगूरी व चिखलप या गावागावातून मार्गस्थ झाले. प्रसंगी प्रत्येक ठिकाणी शिवप्रतिमेस व परिसरातील चौकाचौकातून फुले, रांगोळ्यांनी सजावट करण्यात आली. यावेळी मिरवणुकीत महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्याने जल्लोष पूर्ण वातावरणात संपूर्ण बोर्लीपंचतन शहर हे 'जय भवानी, जय शिवाजी' या घोषणांनी दुमदुमून गेलं होतं.

### पनवेल महानगरपालिकेमार्फत मनपा हद्दीत...

## विद्यार्थ्यांसाठी इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरू करण्याचा ठराव पनवेल महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत मंजूर

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिकेमार्फत मनपा हद्दीत विद्यार्थ्यांसाठी इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरू करण्याचा ठराव पनवेल महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत मंजूर करण्यात आला आहे. पनवेल पालिकेचे विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांनी लक्षवेधी सूचनेद्वारे पालिका हद्दीत इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरू करण्याची मागणी केली आहे, त्यांच्या मागणीला यश आले आहे.



पनवेल महानगरपालिकेमार्फत सद्यस्थितीत ११ शाळा चालविण्यात येत आहेत. यापैकी ८ मराठी माध्यमाच्या शाळा, २ उर्दू व १ गुजराती शाळा आहेत. मात्र अद्याप पनवेल महानगरपालिकेची इंग्रजी माध्यमाची शाळा नाही. मनपाच्या सद्यस्थितीत इ.१ ते इ.७ पर्यंतच्या शाळा आहेत. पालिका हद्दीत इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरू करण्याची मागणी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांनी केली होती. इंग्रजी माध्यमाची होणारी शाळा पूर्व प्राथमिक ते इ.१० पर्यंतच्या वर्गासाठी सुरू केली जाणार आहे.

१८ फेब्रुवारी रोजी झालेल्या ऑनलाईन सभेत पनवेल महानगरपालिकेचे विरोधी पक्ष नेते प्रितम म्हात्रे यांनी इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरू करण्याच्या प्रस्तावाचे अभिनंदन करत मराठी माध्यमांच्या शाळेचा विसर पडू नये म्हणून पनवेल महानगरपालिकेच्या शाळेचा दर्जा उंचावण्यासाठी एका विशेष सभेची मागणी केली.

पालिकेच्या मराठी शाळेची पट्संख्या घसरत चाललेली आहे. या विद्यार्थ्यांच्या आधुनिक शिक्षणसाठी प्रयत्न करायला हवेत.

प्रयोगशाळा, संगणक, संगीत शिक्षक, ग्रंथालय क्रीडा शिक्षक अशा सुविधांचा शाळेत अभाव आहे. त्यामुळे पालिकेच्या शाळेतील विद्यार्थी खासगी शाळेच्या तुलनेत विद्यार्थी मागे पडतात. त्यांचा शैक्षणिक स्तर ऊंचावण्यासाठी नाविन्यपूर्ण योजना राबविल्या पाहिजेत. त्यामुळे शिक्षणाचा दर्जा कसा ऊंचावेल याकडे पहायला हवे. असे मत विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांनी व्यक्त केले.